# <u>परिपत्रक क्रमांक 329 दिनांक 11/10/2007</u>

शासन सेवेतील पहारेकरी/चौकीदार यांना सार्वजनिक सुट्टीचे दिवशी काम करावे लागल्यास त्यांना अनुज्ञेय असलेल्या दैनिक भत्त्याच्या रकमेइतका मोबदला देण्यात यावा. तसेच त्यांच्या नेहमीच्या एका पाळीचे काम संपल्यानंतर दुसया पाळीमध्ये काम करावे लागल्यास त्यांना आठ तास किंवा त्याच्यापेक्षा जास्त तासाकरीता अनुज्ञेय असलेल्या दैनिक भत्त्याच्या 50 टक्के इतकी रक्कम मोबदला म्हणून देण्याबाबत शासन आदेश आहेत. तथापी असे निदर्शनास आले आहे की, पहारेकरी वर्ग दैनिक भत्त्याची मागणी न करता त्याऐवजी बदली रजा घेऊन वारंवार रजेवर जातात. त्यांचे रजा कालावधीत शिपाई कर्मचायांना पहारेकयाचे काम करावे लागते. त्यामुळे शिपाई सुध्दा बदली रजेची मागणी करतात. अशा परिस्थितीत कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण होऊन खोळंबा होतो.

या परिपत्रकाव्दारे सुचित करण्यात येते की, यापुढे शिपाई यांना पहारेकयांचे काम देण्यात येणार नाही. पहारेकयांच्या साप्ताहिक सुट्टीच्या दिवशी पाळीवर हजर असलेल्या पहारेकयांने स्वत:ची पाळी सांभाळून साप्ताहिक सुट्टी असलेल्या पहारेकयाची पाळी करावी. यासाठी पहारेकरी यांना जादा कामगिरी केल्याबद्दल बदली रजेची मागणी करता येणार नाही. त्याऐवजी नियमाप्रमाणे दैनिक भत्त्याची मागणी त्यांना करता येईल. तसेच पहारेकयांनी रजेवर जाणेपूर्वी आस्थापना अधिक्षकांच्या शिफारशीसह अर्ज सादर करावा. अन्यथा सदरची रजा विनावेतन करण्यात येईल. पूर्वपरवानगीने रजा उपभोगल्यास अशा परिस्थितीत शिपाई यांना फक्त 8 ते 4 या कालावधीत पहारेकयाचे काम देण्यात येईल याची पहारेकयांनी नोंद घ्यावी.

धर्मादाय आयुक्त(प्र.),
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रति,

1. श्री.ल.नि.निकाळजे, पहारेकरी,
2. श्री.आ.भा.पंडागळे, पहारेकरी.
3. श्री.एस.एस.हनवते, पहारेकरी.

प्रत,

1. जनसंपर्क अधिकारी,
2. अधीक्षक (आस्थापना)